# २. स्वप्नं विकणारा माणूस

**अशोक कोतवाल** (१९६१) : 'मौनातील पडझड', 'कुणीच कसे बोलत नाही' हे कवितासंग्रह; 'प्रार्थनेची घंटा', 'सावलीचं घड्याळ' हे ललितलेखसंग्रह; 'घेऊया गिरकी' हा बालकवितासंग्रह प्रसिद्ध.

BNLKVT

प्रत्येक मनुष्य आपली स्वप्नं पूर्ण करण्यासाठी सतत धडपडत असतो. स्वहिताबरोबरच समाजाच्या उपयोगी पडणारी व उदात्त हेतू असणारी स्वप्ने पाहावीत, असा संदेश पाठातून दिला आहे. प्रस्तुत पाठ 'सावलीचं घड्याळ' या ललितलेखसंग्रहातून घेतला आहे.

माणसाला स्वप्नं बघता आली पाहिजेत. नुसतीच बघता आली पाहिजेत असं नाही, तर ती पूर्ण कशी होतील याचा विचार करता आला पाहिजे. असं आपणच नाही, तर आपल्यापेक्षा श्रेष्ठ असे सगळेच लोक म्हणत असतात. आता स्वप्नं ही निर्माण करावी लागतात, की ती उत्पन्न होतात हे आपल्याला माहीत नाही. स्वप्नांविषयी लोक काय काय बोलतात ! कुणी कुणी तर स्वप्नांना भलतंच तुच्छ लेखतात. 'भलती-सलती स्वप्नं पाहू नकोस', असा सल्लाही देतात.

माझं तर म्हणणं असं आहे, ज्याला स्वप्न बघता येत नाही तो माणूसच नाही ! जे स्वप्न आपल्याला समृद्ध करतं, ते बघण्यासाठी संवेदनशील मन असावं लागतं. ज्यांच्याकडे असं तीव्र संवेदनशील मन असतं, ती माणसं आपल्या स्वप्नपूर्तीसाठी वाट्टेल ते करतात. इतरांपासून आपल्याला वेगळं करतात. स्वत: काहीतरी आदर्श बनून ते वावरतात, नाहीतर इतरांना आदर्श बनवतात; पण अशा संवेदनशीलतेचा अभाव असणारी माणसं अधांतरीच तरंगत राहतात. ना धड इकडे, ना धड तिकडे अशीच त्यांची अवस्था असते. लोक तिलाच स्वप्नाळू वृत्ती म्हणत असावेत ! बिना ध्यास नि बिना धडपडीशिवाय असलेली ही स्वप्नाळू वृत्ती तशी घातकच, नाही का ? बालपणी आम्हांला स्वप्नांचा खरा अर्थही काही कळत नव्हता; पण स्वप्न या शब्दाशी आमचा परिचय झालेला होता. रात्री झोपलो म्हणजे

**तुम्ही काय कराल ?**



- तुम्ही चांगले धावपटू आहात. शाळेच्या क्रीडासंमेलनात धावण्याच्या स्पर्धेत पहिले बक्षीस मिळवायचे, हे तुमचे स्वप्न आहे. हे स्वप्न पूर्ण होण्याकरिता तुम्ही कोणते प्रयत्न कराल ?

आपल्याला झोपेत जे दिसतं, ते स्वप्न असतं आणि ते काही खरं नसतं, असं आम्हांला माहीत झालं होतं.

आमच्या लहानपणी कोण्या एका गावाकडून एक स्वप्नं विकणारा माणूस घोड्यावर बसून आमच्या गावाकडे यायचा. त्याच्या घोड्याचा 'टबडक् टबडक्' आवाज आला, की आम्ही आवाजाच्या दिशेनं धावत जायचो. आमचं आकर्षण 'घोडा बघणं' हे असायचं; पण घोड्यासोबत मिशीतल्या मिशीत हसणाऱ्या त्या माणसालाही बघणं व्हायचं. तलम रेशमी धोतर, त्यावर तसाच जरीचा सैलसर कुडता, डोक्याला लाल-पांढरा फेटा, डोळ्यांवर चश्मा, पायांत चामडी बूट, गव्हाळ रंगाचा, झुबकेदार मिश्या असलेला हा माणूस होताही तसाच धिप्पाड. या स्वप्नं विकणाऱ्या माणसाची आम्हांला गंमतच वाटायची, शिवाय कुतूहलपण. त्यानं घोड्याच्या पाठीवर ठेवलेल्या मखमली कापडातल्या गाठोड्याकडे आम्ही कुतूहलानं बघायचो.



हा माणूस आमच्या गावच्या पिंपळाच्या पारावर थांबायचा. पाराला असलेल्या लोखंडी कडीला आपला घोडा बांधायचा. घोड्याच्या पाठीवर आणलेलं मखमली कापडातलं गाठोडं जवळ घेऊन, चामडी पिशवीतलं पाणी घटाघटा प्यायचा आणि मग ऐटीत झाडाच्या पारावर बसायचा, तेव्हा त्याच्याभोवती माणसांचा गराडा पडे. त्यानं आजवर घोड्यावरून खूप प्रवास केलेला होता. कित्येक प्रदेश पाहिले होते, कित्येक डोंगरदऱ्या तुडवल्या होत्या, भिन्न स्वभावांची आणि भिन्न संस्कृतींची माणसं पाहिली होती, त्यामुळे त्याच्याकडे बोलण्यासारखं खूप काही असायचं. त्यानं अनुभवलेलं समृद्ध विश्व तो वेगवेगळ्या किश्शांनी रंगवून, फुलवून सांगायचा. लोक त्याच्या गप्पांमध्ये स्वत:ला विसरून जायचे. त्याचं ते भलतंच दिलखेच बडबडणं आणि स्वप्नात धुंद गुंगवणं लोकांना भारी आवडायचं. ऐकताना लोकांची मती कुंठित व्हायची. आपण ऐकतोय ते खरं की खोटं या संभ्रमात ते पडायचे.

ऐकताना लोक तल्लीन होऊन जायचे. त्याच्या त्या अनुभवी बोलांतून लोकांना निरनिराळ्या प्रांतांची, रीतीरिवाजांची माहिती व्हायची. त्यानं वर्णन केलेल्या प्रांतात ते मनानंच भटकून येत. जणू काही आपण स्वप्नातच आहोत, असं त्यांना वाटत राहायचं. मग बऱ्याच वेळानं तो, ते मखमली कापडात बांधलेलं गाठोडं हळूच सोडायचा. त्यात काजू, बदाम, किसमिस, वेलदोडे, सुपारी, खारीक, खोबरं वगैरे असायचं. नाही म्हटलं, तरी लोक घासाघीस करून छटाक–पावशेर विकत घ्यायचेच ! कधीकधी तो गाठोड्यातला खाऊ सगळ्या टिंगू

मुलांना मूठमूठ वाटून द्यायचा. आम्हीही त्याच्यावर भलतेच खूश व्हायचो.

तो निघून गेल्यावर मग लोक म्हणत, 'हा बडबड्या आला, की आपल्यात तरतरी पेरून जातो. त्याच्या बोलण्यानं जगाची ओळख झाल्यासारखं वाटतं. आपलं दु:ख काही काळापुरतं का होईना विसरल्यासारखं होतं. गोडगोड बोलून तो जसं त्याचं स्वप्नच आपल्या डोळ्यांत उतरवून जातो...' पुढे मग लोक त्याला 'सपनविक्या'च म्हणू लागले. त्यालाही त्याचं काहीच वाटेना. तोही मग गमतीनं 'सपन घ्या, सपन' म्हणतच गावात शिरायचा आणि लोकांना रिझवून सुकामेवा विकायचा.

काय झालं कळलंच नाही; पण अचानकच सपनविक्या गावात यायचा बंद झाला. आम्ही रोज त्याची आतुरतेनं वाट पाहायचो; पण तो यायचाच नाही. कधीतरी त्याचा विषय निघायचा अन् गावातले सगळे लोक त्याच्याविषयी भरभरून बोलायचे. महिने, वर्षं उलटून गेली.

एके दिवशी अचानक, एक तरुण गावात आला. गावातल्या पारावर बसला. गावातील पारावर बसलेले लोक त्याच्याकडे टकामका पाहू लागले. तो तरुण सपनविक्यासारखाच दिसत होता. तोच चेहरा, तीच अंगकाठी, जणू सपनविक्याच गावात आला होता. आम्ही सगळी मुलं पाराजवळ जमलो. आमच्या गावातल्या सगळ्यांत वृद्ध तात्यांनी त्याला विचारलं, ''कोण रे बाबा तू? कुठून आलास?''

तो म्हणाला, ''मी तुमच्या सपनविक्याचा मुलगा. गुडघेदुखीच्या त्रासामुळे बाबा बऱ्याच वर्षांपासून गावोगावी जाऊ शकत नाहीत; पण खरं सांगू का? गावांत जाणं, तिथल्या लोकांना एकत्र जमवणं, त्यांच्याशी बोलण्यासाठी सुकामेवा विकणं हे केवळ बाबांचं एक निमित्त होतं. त्यातून त्यांना खूप आनंद मिळत असे. 'आपले अनुभव, आपल्याजवळचं ज्ञान इतरांना सांगावं, दुसऱ्यांना आनंद द्यावा' असं माझ्या वडिलांचं स्वप्न होतं. लोकांची सेवा करण्याचा त्यांचा हा मार्ग मला खूप खूप आवडला. नुकतंच माझं वैद्यकीय शिक्षण पूर्ण झालं आहे. गावोगावी जाऊन वृद्ध, आजारी लोकांची सेवा करायची, असं मी मनोमन ठरवलं आहे. बाबांचं हे स्वप्न पूर्ण करण्यासाठीच मी तुमच्या गावात आलो आहे.''

त्याचा आवाज, बोलण्याची ढब, हसणं आम्हांला सपनविक्याची तीव्र आठवण देऊन गेलं. आम्ही सगळे गहिवरून गेलो. काय बोलावं हे कोणालाच समजेना. असंही स्वप्न असतं, एखादा माणूस असंही स्वप्न पाहू शकतो, हे नव्यानंच आम्हांला उमगलं होतं.

***

## स्वाध्याय



**प्र. १. तुमचे मत स्पष्ट करा.**

(अ) गावात येणाऱ्या माणसाला गावकरी 'सपनविक्या' म्हणत.

(आ) स्वप्नं विकणाऱ्या माणसाचा गावात येण्यामागचा उद्देश.

**प्र. २. स्वप्नं विकणाऱ्या माणसाचे खालील मुद्द्यांच्या आधारे दोन-दोन वाक्यांत वर्णन करा.**

स्वप्नं विकणारा माणूस

- त्याचा पेहराव
- त्याचे बोलणे
- त्याचे स्वप्न

**शिक्षकांसाठी :** विद्यार्थ्यांकडून ही कथा प्रसंगानुसार वाचून घ्यावी, तसेच या कथेचे सादरीकरण करून घ्यावे. वर्तमानपत्रे, मासिके यांमध्ये आलेल्या विविध कथांचा संग्रह करून घ्यावा. त्या कथांचे विद्यार्थ्यांकडून समजपूर्वक प्रकट वाचन करून घ्यावे.

**प्र. ३. खालील आकृत्या पूर्ण करा.**

(अ) स्वप्नाविषयी लेखकाचे मत

(आ) स्वप्नाविषयी इतरांचे मत

(इ) स्वप्नं विकणाऱ्या माणसाजवळील गाठोड्यातील वस्तू

(ई) स्वप्नं विकणाऱ्याचे किस्से ऐकणाऱ्यांचे फायदे

**प्र. ४. स्वप्नं विकणारा माणूस गावात आल्यापासून गाठोडे सोडेपर्यंतच्या घटनांचा ओघतक्ता तयार करा.**

उदा., (१) पिंपळाच्या पारावर थांबणे.

(२)

(३)

(४)

**प्र. ५. कल्पना करा व लिहा.**

स्वप्नं विकणारा माणूस तुम्हांला भेटला आहे व त्याच्याशी तुमचा संवाद झाला आहे.



**चर्चा करूया.**



झोपेत असताना आपणांस स्वप्नं का पडत असतील, याबाबत विचार करा. घरातील मोठ्या व्यक्तींशी किंवा मित्रांबरोबर याविषयी चर्चा करा.

## खेळूया शब्दांशी.

**(अ) पार–झाडाच्या बुंध्याजवळ बसण्यासाठी सभोवताली बांधलेला ओटा, पार–पलीकडे. असे 'पार' या शब्दाचे दोन अर्थ होतात. लक्षात ठेवा–संदर्भानुसार शब्दांचे अर्थ बदलू शकतात. खालील शब्दांचे प्रत्येकी दोन अर्थ लिहा.**

(अ) हार (आ) कर (इ) वात

**(आ) खाली दिलेले वाक्प्रचार व त्यांचे अर्थ यांच्या जोड्या जुळवा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (१) मती कुंठित होणे. | (अ) कंठ दाटून येणे. |
| (२) तरतरी पेरणे. | (आ) विचारप्रक्रिया थांबणे. |
| (३) गहिवरून येणे. | (इ) उत्साह निर्माण करणे. |


**(इ) खाली दिलेल्या शब्दांचा वापर करून वाक्ये तयार करा.**

(अ) कुतूहल (आ) संभ्रम (इ) ढब (ई) आतुरतेने

**उपक्रम :**

(१) 'या बालांनो या रे या' हे गीत मिळवा व परिपाठात सादर करा.

(२) तुमच्या गावात/परिसरात येणाऱ्या अशा काही व्यक्ती आहेत, ज्यांची तुम्ही आतुरतेने वाट पाहत असता. उदा., फुगेवाला, आइस्क्रीमवाला. अशा एखाद्या व्यक्तीची मुलाखत घेण्यासाठी प्रश्नावली तयार करा.



## खेळ खेळूया.

चला मुलांनो, आज आपण एक छानसा खेळ खेळूया. तुम्हांला दिलेल्या अक्षराने सुरू होणाऱ्या गावाचे नाव सुरुवातीला लिहायचे आहे. त्याच्या शेवटच्या अक्षराने सुरू होणाऱ्या दुसऱ्या गावाचे नाव लिहायचे. पुन्हा एकदा त्याच्या शेवटच्या अक्षराने सुरू होणाऱ्या तिसऱ्या गावाचे नाव लिहायचे. आता तिसऱ्या गावाच्या शेवटच्या अक्षराने सुरू होणारे गावाचे नाव लिहायचे; पण अशा गावाचे नाव लिहायचे आहे, ज्याचे शेवटचे अक्षर 'र' असेल. बघूया जमते का ते!

अशाप्रकारे मुले, मुली, फळे, फुले, पक्षी, प्राणी यांची नावे घेऊन गटागटांत हा खेळ खेळता येईल. यातून तुमची शब्दसंपत्ती वाढेल.

उदा., **स** – सोलापूर
**र** – रांजणगाव
**व** – वडनेर
**र** – रावेर

(१) **म** ________
________
________
________ **र**

(२) **ख** ________
________
________
________ **र**

(३) **क** ________
________
________
________ **र**

## आपण समजून घेऊया.

- **खालील वाक्ये वाचा.**

मी शाळा जातो.

मी शाळेत जातो.

ही दोन वाक्ये तुम्ही वाचलीत. यांपैकी पहिले वाक्य चुकीचे आहे आणि दुसरे वाक्य बरोबर आहे. या दोन्ही वाक्यांमध्ये काय फरक आहे? पहिल्या वाक्यात 'शाळा' हा शब्द आहे. दुसऱ्या वाक्यात 'शाळा' या शब्दाला '-त' हा प्रत्यय लागला आहे.

- **खालील वाक्ये वाचा.**

(१) राम मित्राशी बोलतो.

(२) रेश्मा पालीला घाबरते.

(३) कल्पना दुकानात जाते.

या वाक्यांमध्ये,

| **नाम** | **+** | **प्रत्यय** |
|---|---|---|
| मित्र | + | -शी |
| पाल | + | -ला |
| दुकान | + | -त |

मित्र, पाल, दुकान या नामांना अनुक्रमे -शी, -ला, -त हे प्रत्यय जोडलेले आहेत. प्रत्यय लागण्यापूर्वी या शब्दांमध्ये काही बदल झाले आहेत. उदा., मित्र~मित्रा-, पाल~पाली-, दुकान~दुकाना-. शब्दाला प्रत्यय लागण्यापूर्वी होणाऱ्या या बदलाला शब्दाचे **सामान्यरूप** म्हणतात. शब्दाच्या मूळ रूपाला **सरळरूप** म्हणतात. उदा., 'दुकान' हे सरळरूप आणि दुकाना- हे सामान्यरूप.

नामांना किंवा सर्वनामांना लागणारे प्रत्यय अनेक प्रकारचे असतात. -ला,-त,-ने,-शी,-चा,-ची,-चे इत्यादी.

**लक्षात ठेवा :** काही वेळा शब्दाला प्रत्यय लागण्यापूर्वी शब्दाच्या रूपात बदल झालेला दिसत नाही. उदा., खिडकी, खोली यासारखी ईकारान्त स्त्रीलिंगी नामे.

- **आता एक मजेदार खेळ खेळूया.**

शब्दाचे सामान्यरूप न करता काही वाक्ये तयार करा. ती मोठ्याने वाचा. नंतर सामान्यरूपासह ती पुन्हा तयार करा. लिहिताना एक गोष्ट नीट लक्षात ठेवा, की सामान्यरूपातला शब्द आणि त्याचे प्रत्यय जोडूनच लिहायचे असतात. उदा., रवी ने पाल ला मारले. ✗

रवीने पालीला मारले. ✓

घोडा, माळ, पाल, घर, दुकान ही सामान्यनामे आहेत; पण अंजली, सुजाता, राजीव ही विशेषनामे आहेत. विशेषनामांना प्रत्यय लावताना त्यांचे सामान्यरूप होत नाही. उदा., अंजलीला, सुजाताला, राजीवला.

बोलींमध्ये आणि जुन्या मराठीत विशेषनामांची सामान्यरूपे दिसतात. आज ती कमी होत चालली आहेत. पौराणिक पात्रांची नावे मात्र सामान्यरूपात लिहितात. रामाने, दशरथाने, सीतेने, कृष्णाने इत्यादी; पण हीच नावे आताच्या जगातल्या माणसांची असतील, तर सहसा सामान्यरूप होत नाही हे शिक्षकांनी विद्यार्थ्यांना समजावून सांगावे.

✻ आडनावांचे सामान्यरूप होते. उदा., गायकवाडांना, सान्यांना, जोगळेकरांना वगैरे; पण लिहिताना शक्यतो सामान्यरूप न वापरता 'गायकवाड यांना', 'साने यांना' असे लिहितात.

✻ गावांच्या, राज्यांच्या नावांचेही सामान्यरूप होते. उदा., गोवा-गोव्याला, बडोदा-बडोद्याला, पुणे-पुण्याला.

ईकारान्त व अकारान्त ग्रामनामे बऱ्याचदा बदलत नाहीत, हे शिक्षकांनी विद्यार्थ्यांना लक्षात आणून द्यावे.

- **खालील वाक्ये वाचा.**

(१) ही माझी नवी छोटी शाळा.

या वाक्यात 'ही', 'माझी', 'नवी', 'छोटी' हे सारे शब्द 'शाळा' या नामाची विशेषणे आहेत.

आता हे वाक्य वाचा.

(२) ह्या माझ्या नव्या छोट्या शाळेत क्रीडांगणसुद्धा आहे.

तुमच्या लक्षात आले का, 'शाळा' या नामाला प्रत्यय लागल्यावर 'ही', 'माझी', 'नवी', 'छोटी' ह्या विशेषणांचे रूपसुद्धा बदलले. ते शब्द 'ह्या, 'माझ्या' 'नव्या', 'छोट्या' असे बदलले. याला विशेषणाचे सामान्यरूप म्हणतात. जेव्हा नामाचे सामान्यरूप होते तेव्हा विशेषणांचेपण सामान्यरूप होते; पण त्यांना कुठलाही वेगळा प्रत्यय लागत नाही.

- **आता तुम्ही या उदाहरणाप्रमाणे खालील तक्ता पूर्ण करा.**

| ही | माझी | नवी | छोटी | शाळा | ह्या | माझ्या | नव्या | छोट्या | शाळेत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| - | - | - | - | पुस्तक | - | - | - | - | पुस्तकात |
| - | - | - | - | पंखा | - | - | - | - | पंख्याला |
| - | - | - | - | पुस्तके | - | - | - | - | पुस्तकांमध्ये |

तुमच्या हेही लक्षात आले असेल, की नाम पुल्लिंगी असो, स्त्रीलिंगी असो वा नपुंसकलिंगी, एकवचनात असो की अनेकवचनात, त्याच्या विशेषणांचे सामान्यरूप फक्त 'या' लागून होते.

आहे ना गंमत !

- **अधोरेखित शब्दांविषयी खालील माहिती भरून तक्ता पूर्ण करा.**

| वाक्ये | सरळरूप | सामान्यरूप | प्रत्यय |
|---|---|---|---|
| (१) <u>रमेशचा</u> भाऊ <u>शाळेत</u> गेला. | (१)<br>(२) | | |
| (२) <u>बँकेने</u> <u>शेतकऱ्याला</u> कर्ज दिले. | (१)<br>(२) | | |
| (३) <u>सुट्टीत</u> तो <u>मित्रांशी</u> खेळतो. | (१)<br>(२) | | |
| (४) <u>मंडईत</u> <u>फळांच्या</u> गाड्या आहेत. | (१)<br>(२) | | |